कार्यालय

**सहाय्यक निंबधक सहकारी संस्था नवापुर जि. नंदुरबार**

तहसिल कार्यालय रोड, नवापुर

E-mail.ar.navapr@rediffmail.com Phone No.-०२५६९ - २५०२०२

जाक्र./सखी महीला/पतसंस्था/कलम८३/चौअधि/प्राधि /सन१७ दिनांक ११ /०९/२०१७

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये आदेश

वाचले:- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ तील तरतुद
२) या कार्यालयाचे पत्र जाक्र. सनिन/लेप/अधिनियम/नियम/पोनि/पालन/सन१७दि. १०/७/२०१७
३) या कार्यालयाचे पत्र क्र. /विकास-२/सखीमहिला/कलम८३/कादानो/सन१७ दि. २३/०८/२०१७

ज्या अर्थी सखी महीला नागरी सहकारी पतसंस्था मर्था नवापुर ता. नवापुर जि. नंदुरबार ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ तील तरतुदीनुसार नोंदणीकृत सहकारी पतसंस्था आहे. संस्थेचे कामकाज हे अधिनियम, नियम व मंजुरी उप विधीतील तरतुदीप्रमाणे करणे बंधनकारक आहे. सदर संस्थेचे कार्यक्षेत्र नवापुर तालुका पुरते मर्यादित असल्याने वैधानिकदृष्ट्या या कार्यालयाचे अधिकार कक्षेत येत आहे.

ज्या अर्थी सदर संस्थेचे सन २०१५ - १६ या कालावधीचे लेखापरीक्षण जयश्री डी. गांगुर्डे प्रमाणित लेखापरीक्षक, धुळे यांनी केले आहे व लेखापरीक्षण अहवाल या कार्यालयास सादर केला आहे. सदर लेखापरीक्षण अहवालात निदर्शणास आलेल्या अनियमित बाबी संस्थेच्या निदर्शणास संदर्भीय पत्र क्रमांक १ अन्वये आणुन दिल्या होत्या व पुर्तता अहवाल दिनांक २५/०७/२०१७ रोजी समक्ष हजर राहुन सादर करणेबाबत कळविले होते. परंतु संस्थेने पुर्तता अहवाल सादर केलेला नाही किंवा दिलेल्या सुनावणी तारखवेरही हजर राहीले नाही. सदर दिलेल्या तारखेपर्यंत लेखी खुलासा सादर केला नाही व सुनावणी तारखेवर हजर झाले नाही ही बाब पाहता संस्था अधिनियममातील तरतुदींचे उल्लघंन करित असलयाचे स्पष्ट दिसुन आलेप्रमाणे संस्थेचे कामकाजाबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी का प्रस्तावित करण्यांत येउ नये याबाबत लेखी व तोडी म्हणने मांडणेसाठी दिनांक ६/९/२०१७ रोजी हजर राहणेबाबत वाचले मधील पत्र क्रमांक ३ अन्वये कळविण्यांत आले होते. परंतु सदर दिलेल्या तारखेपर्यंत संस्थेने कोणताही लेखी किंवा तोडी खुलासा सादर केला नाही व गैरहजेरीबाबतही खुलासा सादर केला नाही.

ज्या अर्थी सदर संस्थेचे लेखापरीक्षण अहवालावरुन संस्था मंजुर उप विधीतील तरतुदीप्रमाणे कामकाज करित नसल्याचे खालील मुद्यांवरून दिसुन आले आहे.

१. संस्थेने उभारलेल्या वैधानिक निधीची पुर्णपणे स्वतंत्र गुंतवणुक केली नाही.
२. संस्थेने नियमबाह्या समव्यवसाईक पतसंस्थेत गुंतवणुक केली आहे.
३. संस्थेने थकीत कर्जदारावर कारवाई केली नाही.
४. उपविधीतील तरतुदीप्रमाणे संचालक मंडळाने आवश्यक ठेवी ठेवलेल्या नाहीत
५. मागिल वर्षाचे दोष दुरूस्ती अहवाल सादर केला नाही,
६. गुंतवणक व बँक खात्याचे ताळमेळ पत्रक सादर केले नाही
७. झालेल्या नफ्याचे विनियोजन केलेले नाही.
८. संस्थेने सभासदांचे आय व जे नमुन्यात अद्यायात यादी ठेवलेली नाही,
९. संस्थेने फक्त अ वर्गसभासदाकडुन ठेवी स्विकारल्याचे व कर्ज वाटप केल्याचे स्पष्ट होत नाही.
१०. संस्थेने सभासदाकडुन के वाय सी घेतलेले नाही
११. सोने तारण कर्ज वाटप उपविधीतील तदतुदीप्रमाणे केल्याचे दिसुन आले नाही.
१२. लांभाश वाटप केल्याचे दिसत नाही.

. उपरोक्त ह्या सर्व बाबीस चेअरमन/व्हॉ.चेअरमन / सर्व सचालक मंडळ व सचिव जबाबदार असल्याचे प्रथम दर्शनी दिसुन आले आहे. नियमबाह्य झालेल्या आर्थिक व्यवहाराची सर्व रक्कम चेअरमन/व्हॉ.चेअरमन / सर्व सचालक मंडळ व सचिव यांचेवर जबाबदारी निश्चित करणे क्रमप्राप्त झाले आहे. सदर आर्थिक नुकसानीची जबाबदारी संबधितावर निश्चित करणेसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी करणे हे संस्थेचे सभासदाचे व संस्थेचे हितासाठी तसेच सार्वजनिक हितासाठी आवश्यक झाले आहे अशी माझी धारणा झाली आहे.

त्या अर्थी खालीलप्रमाणे आदेश पारीत करित आहे.

आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी प्रताप पाडवी सहाय्यक निंबधक सहकारी संस्था ता नवापुर जि. नंदुरबार सखी महीला नागरी सहकारी पतसंस्था मर्या नवापुर ता. नवापुर जि. नंदुरबार या सहकारी संस्थेचे सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मध्ये नमुद मुद्यांवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ मधील तरतुदीनुसार चौकशी करणेसाठी श्रीमती एस. सी. कोळी, सहाय्यक सहकार अधिकारी, यांची प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती करित आहे.

प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी प्रस्तुतच्या आदेशात नमुद केलेल्या व्यवहारामध्ये संस्थेच झालेल्या नुकसानीस कोण जबाबदार आहे व ते किती रक्कमेस जबाबदार आहे हे निश्चित करून स्वयस्पष्ट अहवाल एक महीन्याचे आत सादर करावा. प्राधिकृत चौकशी अधिकारी यांचे मेहनतानाचे आदेश अलहिदा पारीत करणंत येतील.

सदरचा आदेश आज दिनांक १९/०९/२०१७ रोजी माझी सहीशिक्यानिशी देत आहे

सहायक निबंधक सहकारी संस्था नवापुर, जि.नंदुरबार

(प्रताप पाडवी)<br>सहाय्यक निंबधक<br>सहकारी संस्था ता. नवापुर

ठिकाण:- नवापुर<br>दिनांक:- १९/०९/२०१७

**प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी**

१) श्रीमती एस. सी. कोळी, सहाय्यक सहकार अधिकारी, तथा प्राधिकृत चौकशी अधिकारी सखी महीला नागरी सहकारी पतसंस्था मर्या नवापुर ता. नवापुर जि. नंदुरबार

त्यांनी उपरोक्त सहकारी संस्थेतील वर नमुद मुद्याची चौकशी करून चौकशी अहवाल मुदतीत या कार्यालयास सादर करावा

२) चेअरमन/ सचिव, सखी महीला नागरी सहकारी पतसंस्था मर्या नवापुर ता. नवापुर जि. नंदुरबार

त्यांना कळविण्यांत येतें की, चौकशीकामी लागणारी आवश्यक ती कागदपत्रे व माहीती या प्राधिकृत चौकशी अधिकारी यांना उपलब्द करून देण्यांत यावी.

३) शाखा व्यवस्थापक, दि धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि धुळे शाखा नवापुर

**प्रतिलीपी माहीतीसाठी सविनय सादर**

१. मा. विभागिय सह निंबधक, सहकारी संस्था नासिक विभाग नासिक
२. मा. जिल्हा उप निंबधक सहकारी संस्था नंदुरबार
३. मा. जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग १ सहकारी संस्था नंदुरबार
४. म. कार्यकारी संचालक, दि धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि धुळे

सहाय्यक निंबधक<br>सहकारी संस्था, ता. नवापुर